**आकाशवाणी नागपूर,**
**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शनिवार, दिनांक २२ जून २०२४**

**ठळक बातम्या**

1. **उद्योग व्यवसाय आणि शैक्षणिक संस्थांमध्ये समन्वय आणि संवाद असणे आवश्यक- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपुरात प्रतिपादन.**
2. **स्पर्धा परिक्षांमधले गैरप्रकार आणि अनियमिततेला आळा घालण्यासाठीचा, सार्वजनिक परिक्षांमधील अयोग्य माध्यमांना प्रतिबंध कायदा २०२४ आजपासून लागू.**
3. **अमरावतीच्या सुपरस्पेशालिटी मधील कॅथलॅबचे लोकार्पण, आरोग्य सेवा-सुविधा नियमितपणे सुरु ठेवाव्यात-पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे जिल्हा नियोजन बैठकीत निर्देश.**

**आणि**

4. **विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने नागपुरात संक्षिप्त पुनरिक्षण अंतर्गत 25 जून ते २४ जुलै या कालावधीत घरोघरी भेटी देऊन मतदार यादीची तपासणी करणार.**

*****

केंद्रीय मंत्री-नितीन गडकरी

शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक आणि शैक्षणिक ज्ञानातून निर्माण होणारे संशोधन आणि परिसरातील विकास हे परस्पर पूरक असायला हवं. उद्योग विकासाकरिता त्या क्षेत्रातील उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यामध्ये समन्वय आणि संवाद असणे आवश्यक आहे असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ए.के.डोरले सभागृहात आयोजित कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री-सीआयआय विदर्भ रीजन द्वारे आयोजित इंडस्ट्री अकॅडमीया कॉन्क्लेव्ह प्रसंगी आयोजित 'विदर्भामध्ये शैक्षणिक धोरणाला चालना' या विषयावर ते बोलत होते.उद्योग समूहांनी उद्योग विकासासाठी कौशल्यपूर्ण मनुष्यबळ मिळण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालय उभारणीच्या माध्यमातून पुढाकार घेणं आवश्यक आहे. एव्हिएशन, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन अशा क्षेत्रांमध्ये विदर्भात

रोजगार निर्मितीला खूप वाव असून, यासाठी उद्योग समूहांनी पुढाकार घेणं आवश्यक आहे. या उद्योगसमूहांनी स्टार्टअप परिसंस्था, कच्च्या मालाला तसेच स्थानिक मनुष्यबळाला योग्य रीतीने चालना देणे आवश्यक असून परिक्षण केलेल्या तंत्रज्ञानाने या क्षेत्रामधील उद्योग विकास करावा असे देखील गडकरी यांनी नमूद केलं. दिवसभर चालणाऱ्या या कॉन्क्लेव्हमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या आणि उद्योग विकासा संदर्भात योगदानाचे विचारमंथन करण्यात आलं. यामध्ये सीआयआय विदर्भ प्रदेशचे पदाधिकारी आणि विदर्भातील 13 शिक्षण संस्था मधील शैक्षणिक तज्ञ यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सीआयआय विदर्भ क्षेत्रचे उपाध्यक्ष व्ही .सी जामदार यांनी केले.

सार्वजनिक परिक्षा कायदा

स्पर्धा परिक्षांमधले गैरप्रकार आणि अनियमिततेला आळा घालण्यासाठीचा, सार्वजनिक परिक्षांमधील अयोग्य माध्यमांना प्रतिबंध कायदा २०२४ आजपासून लागू झाला. कार्मिक मंत्रालयानं राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे ही माहिती दिली. या कायद्यात गुन्हेगारांना जास्तीत जास्त दहा वर्ष तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. यासंदर्भातलं विधेयक संसदेनं फेब्रुवारी महिन्यात मंजुर केलं होतं. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, राष्ट्रीय चाचणी संस्था-एनटीए रेल्वे भरती आणि बँकिंग भरती अशा विविध सार्वजनिक परिक्षांमध्ये होणार्या अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. दरम्यान, राष्ट्रीय चाचणी संस्थेद्वारे (National Testing Agency-NTA) द्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडाव्यात यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण विभागाने तज्ञांचा सहभाग असलेली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष इस्रोचे माजी अध्यक्ष आणि अध्यक्ष, प्रशासक मंडळ, आयआयटी कानपूर डॉ.के.राधाकृष्णन असतील तर इतर सदस्यामध्ये डॉ.रणदीप गुलेरिया, सदस्य माजी संचालक, एम्स दिल्ली. प्रा.बी. जे.राव, सदस्य कुलगुरू, हैदराबाद केंद्रीय विद्यापीठ गोविंद जयस्वाल, सहसचिव, शिक्षण मंत्रालय यांचा समावेश आहे.

युजीसी नेट

ज्युनिअर रिसर्च फेलोशिप आणि व्याख्याते म्हणून निवड करण्यासाठी संयुक्तपणे घेतली जात असलेली सी एस आय आर युजीसी नेट परीक्षा राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेनं पुढे ढकलली आहे. २५ जून ते २७ जून दरम्यान ही परिक्षा नियोजित होती. मात्र परीक्षा आयोजित करण्यासाठी पुरेशी संसाधनं नसल्याचं सांगत अपरिहार्य कारणानं ही परिक्षा पुढे ढकलली असल्याचं  एनटीएनं म्हटलं आहे.

एमएचटी सीईटी

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया संगणकाधारित आणि केंद्रीय पद्धतीने राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. हीच पद्धत नंतर केंद्र सरकारने स्वीकारली आहे. ही पद्धत पूर्णपणे पारदर्शक आणि मानवी हस्तक्षेपरहीत आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि  पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी आज मुंबईतील पत्रकार परिषदेत केलं. यावेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक विनोद मोहितकर उपस्थित होते. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, कृषी शिक्षण या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यंदा ६ लाख ७५ हजार ३७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. उमेदवाराचे एखाद्या प्रश्नांचे उत्तर चुकीचे असल्यास त्या प्रश्नाला ऋण गुण देण्याची पध्दत नाही. हा निकाल पर्सेंटाईल पध्दतीने घोषित करण्यात आलेला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग

विद्यापीठ अनुदान आयोगानं देशातल्या १५७ विद्यापीठांवर लोकपाल नियुक्ती न केल्याप्रकरणी नोटीस बजावली आहे. यामध्ये १०८ सरकारी, ४७ खासगी आणि दोन अभिमत विद्यापीठांचा समावेश आहे. यात परभणीचं वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, मुंबईतलं एसएनडीटी विद्यापीठ, नागपूर इथलं पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक इथलं आरोग्य विज्ञान विद्यापीठ, पुण्याच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठासह महाराष्ट्रातल्या नऊ विद्यापीठांचा समावेश आहे. या सर्व विद्यापीठांनी तत्काळ लोकपाल नियुक्त करून यूजीसीला त्याबाबत माहिती द्यावी, असं याबाबतच्या परिपत्रकात म्हटलं आहे.

चंद्रकांत पाटील

अमरावती जिल्ह्यातील सुपरस्पेशालिटी इथं नव्याने उभारण्यात आलेल्या कॅथलॅबमुळे विभागातील सर्वसामान्य आणि  गोरगरीब रुग्णांना हृदयरोगासंबंधीच्या आजारावर उपचाराची सुविधा उपलब्ध झाली आहे. नवीन उपचार सेवा-सुविधा कार्यान्वित होत असताना त्या नियमितपणे सुरु राहाव्यात, याची जाणीवपूर्वक खबरदारी घ्यावी, अशा सूचना राज्याचे उच्च आणि  तंत्रशिक्षण आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज रुग्णालय प्रशासनाला दिल्या. अमरावती इथल्या  विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात  उभारण्यात आलेल्या हृदयरोगसंबंधीच्या कॅथलॅबचे लोकार्पण पालकमंत्री  पाटील यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन बैठक घेण्यात आली. दरम्यान, अमरावती इथल्या खेळाडूंना स्थानिक पातळीवर आवश्यक क्रीडा सुविधा उपलब्ध होण्यासाठी विभागीय क्रीडा संकुल आणि जिल्हा क्रीडा संकुलात अत्याधिक सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील, असं प्रतिपादन चंद्रकांत पाटील यांनी आज केलं.जिल्हा वार्षिक योजना सन 2023-24 चा निधी नियोजित कामावर तात्काळ खर्च करा असंही ते म्हणाले. दरम्यान, चंद्रकांत पाटील यांच्या बैठकीपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने नवीन खासदाराला कार्यालय न देण्यात आल्याने जिल्हाधिकारी हे कार्यालय दुसर्या  खासदाराला देऊ इच्छितात असा आरोप करत काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांच्या सह नवनिर्वाचित खासदार बळवंत वानखेडे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या खासदार कार्यालयाचे कुलूप तोडून कार्यालयात प्रवेश केला.

आपत्ती व्यवस्थापन दूरध्वनी पुस्तिका

नैसर्गिक आपत्ती काळात जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी विभागीय, जिल्हा तसेच तालुकास्तरावर कार्यान्वित विदर्भातील  सर्व जिल्ह्यातील यंत्रणांचा समन्वय, दूरध्वनीच्या माध्यमातून सुलभ होण्याच्या दृष्टीने माहिती व जनसंपर्क महासंचालनायाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या ‘आपत्ती व्यवस्थापन दूरध्वनी पुस्तिका-2024’ चे प्रकाशन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते करण्यात आले.

टी-ट्वेंटी

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि बांग्लादेश दरम्यान सामना होणार आहे. अँटिग्वा इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल.

संक्षिप्त पुनरिक्षण

आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहु नये या करीता भारत निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे. सदर संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी 25 जून ते २४ जुलै या कालावधीत घरोघरी भेटी देऊन मतदार यादीची तपासणी करणार असून जे मतदार 18 वर्षाचे झालेले आहे अशा पात्र मतदारांचे नमुना क्र.6 भरुन घेतील. मतदार यादीत मृत मतदार, दुबार मतदार व जे मतदार त्यांचे पत्त्यावर आढळत नाही अशा मतदारांचे नाव मतदार यादीतून कमी करुन मतदार यादीतील त्रुटया दुर करतील. विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करावयाचे असून या अंतर्गत आवश्यकतेनुसार मतदान केंद्राच्या नावात बदल, ठिकाणात बदल, पत्त्यात बदल करुन घेता येईल. उपरोक्त सर्व दुरुस्तीसह 25 जुलै रोजी एकत्रीकृत मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. 25 जुलै ते 9 ऑगस्ट या कालावधीत प्रसिध्द केलेल्या मतदार यादीवर दावे व हरकती सादर करता येईल. याच कालावधीत शनिवार आणि रविवार विशेष शिबिर आयोजित करण्यात येईल. मतदार यादीत समाविष्ट करण्याबाचचा अर्ज Online (ceoelection.maharashtra.gov.in/ceo/ किंवा Voter Helpline App) Offline (मतदार नोंदणी अधिकारी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी, मतदार मदत केंद्र, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी इ.) येथे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या 26 तारखेपर्यंत विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान ३० ते ४० किलोमीटर प्रति तास या वेगाने सोसाट्याचा वारा वाहू शकतो. दरम्यान, मान्सून नुकताच विदर्भात दाखल झाल्यामुळे प्रदीर्घ उष्म्या पासून वैदर्भीय लोकांना यांना दिलासा मिळाला आहे. गोंदिया, इथं गेल्या २४ तासात 37 पूर्णांक 8 सेल्सिअस इतक्या

कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आज विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

******